## महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन २०१७

## लातूर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०१७ .

जाहिरात क्रमांक :-०१/२०१७ ठिकाण :- लातूर दिनांक २४/०२/२०१७

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या अटी व शर्तीनुसार लातूर जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या पदांपैकी शासनाने मंजुरी दिलेली ७५ टक्के पदेच भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

१) पोलीस शिपाई :

| | खुला | अ.जाती | अ.ज. | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकूण | 18 | 4 | 3 | 1 | 0 | 1 | 2 | 1 | 3 | 33 |
| कप्पीकृत ⇩ आरक्षण | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 5 | 2 | 2 | 1 | 0 | 1 | 1 | 1 | 2 | 15 |
| महिला | 5 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 9 |
| खेळाडू | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| प्रकल्पग्रस्त | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| भुकंपग्रस्त | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| माजी सैनिक | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 |
| अंशकालीन-पदवीधर | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| पोलीस पाल्य | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| गृहरक्षक दल | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |
| एकूण | 18 | 4 | 3 | 1 | 0 | 1 | 2 | 1 | 3 | 33 |

२) अ) उपरोक्त पदे ही दिनांक ३१/१२/२०१७ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या संभाव्य पदांची गणना करुन जाहीर करण्यात आलेली आहेत. सदरची रिक्त पदे सामाजिक आरक्षणांतर्गत मागील अनुशेष व बिंदुनामावलीनुसार निश्चित करण्यात आलेली आहेत.

ब). अंतीम निवड यादीतील प्रवर्गनिहाय गुणवत्ता क्रमानुसार येणाऱ्या उमेदवारांना या घटकाच्या आस्थापनेवर जसजशी पदे रिक्त होतील तसतशी प्रवर्गनिहाय उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. सदर निवड यादीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

क) पोलीस शिपाई पदाच्या भरती प्रक्रियेत निवड होऊन पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झालेल्या उमेदवारास पोलीस नियमावली, १९९९- भाग-३ मधील नियम ४० व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व घटक प्रमुखांनी वेळोवेळी विहित केलेली कर्तव्ये पार पाडावी लागतील.

ड ) सध्या पोलीस विभागात वाहन चालकाचे स्वतंत्र्यरितेने पदे भरली जात नसल्यामुळे पोलीस शिपाईपदी नियुक्ती झाल्यावर संबंधित पोलीस विभागात वाहन चालकाचे कर्तव्य बजावणे बंधनकारक राहिल. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने वाहन चालकाच्या कर्तव्याच्या अनुषंगाने वेळोवेळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील.

# लातूर जिल्हा पोलीस शिपाई भरती २०१७

पोलीस अधीक्षक लातूर यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे भरण्यात येणार आहेत. ह्या बद्दलची सविस्तर माहिती www.mahap gov.in व mahapolice.mahaonline.gov.in व www.laturpolice .com या संकेतस्थळ उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई पदांसाठी ऑनलाईन आवेदन करता येईल. पोलीस शिपाई पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर केल्यास लागू असलेले परि आकारण्यात येईल. उमेदवाराने अर्ज भरलेल्या दोन घटकांतील परीक्षेच्या तारखा एकाच दिवशी त्याची जबाबदारी ह्या कार्यालयाची राहणार नाही. त्यामध्ये बदल करता येणार नाही.

- वरील प्रकारच्या पदांसाठी मैदानी चाचणी व लेखी परीक्षा कोठे होईल याचा तपशील दर्शविणारे जाहिरातीसोबत देण्यात आलेले आहे. त्यामध्ये बदल झाल्यास त्याबाबत उमेदवारांना कळविण्यात ये
- टप्प्याटप्प्याने प्राप्त झालेल्या आवेदन अर्जांवर प्रक्रिया करून शारीरिक मोजमाप व मैदानी च उमेदवारांना प्रवेशपत्र पाठविण्यात येणार आहेत. म्हणून उमेदवारांनी सुरुवातीपासूनच अर्ज भरावेत.

- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याह रद्द होईल. उमेदवारांची शारीरीक व लेखी चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल शारीरीक व लेखी चाचणीद्वारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.

- यावर्षी प्रथम शारिरीक मोजमाप, त्यानंतर मैदानी चाचणी व लेखी परीक्षा व तद्नंतर तात्पुरती जाहिर व तात्पुरत्या निवडयादीतील उमेदवारांचीच कागदपत्रे पडताळणी करण्यात येणार आहे. व उमेदवारांची अंतिम निवडयादी प्रसिध्द करण्यात येईल.

- जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

- जाहिरातीतील नमूद केलेल्या रिक्त पदांची संख्या / पूर्ण पदे भरण्याबाबत शासन आदेशाच्या अधी पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

**(डॉ. शिवाजी राठोड)**
**पोलीस अधीक्षक,लातूर**

(10)